# व्यवस्थापन

सहकारी शेतीचे आणखी एक वैशिष्ठ असते ते म्हणजे शेतीचे योग्य व्यवस्थापनापासून उत्पन्नामधील वाढ शेतीची प्रत सुधारणे हा असतो. आपल्या देशातील सहकारी संस्थांच्या व्यवस्थापनाचा अनुभव निराशाजनक आहे. साहजीकच विठ्ठल सहकारी संस्थाच्या सोसायटीचा या क्षेत्रातील अनुभव कसा आहे हे पाहणे महत्वाचे आहे आमच्या अनौपचारिक सहभागावर आधारित निरक्षणावरून असे पाहणीत आले की विठ्ठल सहकारी सोसायटी-च्या खातेदार सभासदांची वर्षातून एकदा सर्व साधारण सभा होते त्यात कार्यकारिणीची निवडणूक होते. कार्यकारिणीत अकरा सभासद असतात. कार्यकारिणीत एक स्त्री सभासद आहे ती स्त्री पूर्वा आयुष्यात देवदासी होती.

कार्यकारीणीची बैठक महिन्यातून एकदा होते सर्व सभासद उपस्थित असतात कार्यकारिणी सोसायटीच्या कारभाराबाबत सर्व निर्णय घेते व अंमलबजावणीची व्यवस्था करते. सोसायटीचे सामुदायिक शेतीचे काम रोजच्या रोज ठरविण्यासाठी रोज रात्री एक बैठक होते त्यास "वर्दी" म्हणतात या बैठकीस सोसायटीचे चेअरमन, मुकादम, कार्यकारिणीचे कांही सभासद व इतर सभासद ही हजर असतात.

" वर्दी " रोज बराच वेळ चालते झालेल्या कामाचा आढावा आणि दुस-या दिवशीचे काम यावर सविस्तर चर्चा होते व निर्णय घेतले जातात.

कार्यकारीणीचे सदस्य बदलत असल्याचे दिसते अध्यक्ष ही बदलले आहेत सध्याचे अध्यक्ष कार्यक्षम आहेत दिवसभर ते सोसायटीच्या कार्यात दंग असतात दिवसातून एकदा शेती प्रकल्पावर फेर फटका मारून शेतीची पाहणी करतात कार्यकारीणीच्या एकूण अकरा सभासदापैकी कांही सभासद निरक्षर आहेत हे पाहणीवरून आढळून आले शिक्षीत सदस्यांनी आपापसात खाते वाटप केले

आहे. शेती विभाग यंत्र विभाग दुध विभाग असे तीन प्रमुख विभाग आहेत. याशिवाय सर्वसाधारण विभाग आहे. सभासदांत शेतीच्या कारभाराविषयी जागृकता दिसून आली प्रत्येक बाबीवर सविस्तर चर्चा होते. मतभेद स्पष्टपणे मांडले जातात. निर्णय बहुदा एक मताने घेतले जातात. विठ्ठल सोसायटीची शेती सात तुकडयामध्ये विभागली गेलेली आहे आणि हे सात तुकडे निरनिराळ्या ठिकाणी आहेत या सात तुकडयांची नावे अशी १] म्हारकी, २] देसकत, ३] मळी, ४] गस्त्याचे माळ ५] घाबरे पट्टी, ६] चांभाराचे माळ. ७] घालवाडी पट्टी.

वरीलपैकी म्हारकी मळी हे दोन जमिन गावठाणात आहेत देसकत गावठाणापासून एक मैलावर, गस्त्याचे माळ व घाबरे पट्टी ही जमिन सुमारे तीन मैलावर आहे. व चांभाराचे माळ आणि घालेवाडी पट्टी एक मैलावर अशारितीने ही सोसायटात समाविष्ट झालेली शेती विखुरलेली आहेत तसेच शेताची प्रत ही सारखी नाही व्यवस्थापनाच्या दृष्टीने या विभागणीमुळे गैरसोय होते. प्रत्येक तुकडयाचे थोडक्यात वर्णन दिल्याने - सोसायटीच्या सर्वसाधारण कार्यक्षमतेबाबत कल्पना येण्यास मदत होईल.

१] म्हारकी :- म्हारकीत एकूण ५२ एकरांचा हा सलग तुकडा सर्वात महत्वाचा मानला जातो हे शेत संपूर्णपणे बागायती आहे. जमिनीची प्रत ही चांगल्या दर्जाची आहे. गावठाण हददीत शेत असल्याने साहजीकच या शेताकडे जास्त लक्ष दिले जाते. सधा या शेतामध्ये १७ एकर द्राक्षबाग व १० एकर ऊस व १० एकर कापूस १५ एकर कडधान्य ज्वारी गहू इत्यादी आहे देखरेख ठेवण्याच्यादृष्टीने हा तुकडा सोयीचा आहे.

२] मळी :- हा १३ एकरांचा तुकडा नदीच्या काठावर असून त्याचा उपयोग सभासदांच्या जनावरांना लागणारी वैरण करण्यासाठी केला जातो.

३] देसकत :- ही जमीन ७ एकर वीस गुंठे आहे या जमिनीची मालकी सरकारची होती. पूर्वीच्या रिवाजाप्रमाणे हे शेत दरवर्षी लिलाव होवून महार कुटूंबाना एकत्रीत कसण्यासाठी मिळत असे. ही छत्तीस एकर जमिन त्रेपन महार लोकामध्ये वाटली जात असे प्रामुख्याने ज्वारी, वैरण या-साठी या शेताचा उपयोग होत होता. वैरण व ज्वारी यांच्या उत्पन्नाचे त्रेपन सारखे वाटे महार कुटूंबात वाटणी केली जात असे. सन १९५३ ते सन १९५६ या तीन वर्षामध्ये अशा त-हेने या जमिनीचा वापर होत होता परंतु नंतर पक्षीय राजकारण आडवे आले, गांवक-यांच्या म्हणण्यानुसार म महार लोकांनी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांना पाठिंबा न दिल्यामुळे लिलाव महारांच्या बाजुने होणे बंद झाले. सन १९५७ मध्ये जमिन पडीक राहिली पुढे तहशिलदार स्वत: गावी येवून त्यांनी या शेतीच्या तुकडयाचे चोविस एकर जमिन महार कुटूंबांना दिली सात एकर मातंग कुटूंबाना वाटून दिली इतर सात एकर जमिन इतर जमातीच्या इसमांना प्रत्येकी पाच एकर वाटली असे वाटप होत होत महार कुटूंबांच्या वाटल्या, सधा फक्त साडे सात एकर आली ही सात एकर वीस गुंठे जमिन सोसायटीत सामिल केली आहे.

४] गस्त्यांचे माळ :- एकुण ३५ एकरांचे हे शेत गावापासून बरेच दूर आहे दोन वर्षापूर्वी विहीर खणल्यामुळे पाण्याची सोय झाली आहे.

५] चांभाराचे माळ :- एकूण २२ एकर बावीस गुंठे असलेली हे शेत एका चांभार कुटुंबांच्या मालकीचे आहे त्याने हे आपले शेत विठ्ठल सोसायटीच्या शेतात समाविष्ट करुन घेतले. सोसायटीत हे शेत सामिल करण्याचा करार दि. ६-१०-७७ रोजी झाला. वार्षिक खंड एकरा दोनशे रुपये ठरला या इसमाचे पूर्वीचे ५३९५० रुपये इतके कर्ज होते. सोसायटीने हे कर्ज फेडण्याची

जबाबदारी स्विकारली.

६] घालवाडे पट्टी :- एकूण ३ एकर पंधरा गुंठे असून मराठा कुटुंबाच्या मालकीची आहे. पूर्वीचे सहा हजार रुपये कर्ज होते ते सोसायटीने कर्ज फेडण्याची जबाबदारी स्विकारून ही जमिन ताब्यात घेतली.

७] धाबरे पट्टी :- ही जमिन धाबरे नावाच्या लिंगायत कुटुंबाच्या मालकीची ही जमीन एकूण साडे नऊ एकर जमिन आहे. जमिनीवर पूर्वी तीस हजार रुपये इतके कर्ज होते. ही जमिन पंधरा वर्षाचा करार करून जमिनीत सोसायटी जी गुंतवणूक करील त्या गुंतवणुकीसह करार संपल्यानंतर त्यांची जमिन परत करावयाचे ठरले.

वरील जमिनीचे तुकडे विठ्ठल सहकारी शेती सोसायटीच्या व्यवस्थानाद्वारे जमीन कसण्याचे ठरले व जमिनीतून नगदी पिके, कडधान्ये, इतर पीके घेण्यात आली. विठ्ठल सहकारी शेती सोसायटीचे व्यवस्थापन अधिक कार्यक्षम व डोळस व्हावयास पाहिजे, शेतीच्या सर्व तुकड्यावर सारख्या प्रमाणावर लक्ष दिले जात नाही हे स्पष्ट आहेत पण ज्या तुकड्यांवर अधिक लक्ष पुरविले जाते, तेथील शेती ही उत्तम प्रकारे चालू आहे असे ही म्हणता येत नाही. त्याची दोन कारणे या दृष्टीकोनातून अभ्यास करण्यास आवश्यक अशापध्दतीने माहिती लिहून ठेवलेली नाही हे पाहिले कारण दरवर्षी कोणती पीके किती क्षेत्रावर घेतली या माहिती व्यतिरिक्त पीकवार खर्च व व उत्पादन अशी स्वतंत्र माहिती लिहून ठेवलेली नाही सभासदांना व्यवस्थापनावर लक्ष ठेवण्यासाठी अशा त-हेची माहिती आवश्यक आहे.

एकरी उत्पादन एखाद्यावर्षी कमी असल्यास त्याची कारण मिमांसा करून त्यात व्यवस्थापनातील दोष किती इत्यादी गोष्टी स्पष्ट करून त्या दृष्टीने उपाय योजना शक्य होते.

१९६९ ते १९८८ पर्यन्त सोसायटीत समाविष्ट झालेल्या सभासदांची आकडे खालीलप्रमाणे.

| वर्ष | सभासद संख्या |
|---|---|
| १९६९ | ६५ |
| १९७१-७२ | ९५ |
| १९७४-७५ | १०१ |
| १९७६-७७ | १०४ |
| १९७७-७८ | १०५ |
| १९७९-८० | १०९ |
| १९८८-८९ | १०९ |
| १९८९-९० | ९९ |

वरील तक्त्यावरुन विठ्ठल सहकारी सोसायटीची सन १९६९ साली सभासद ६५ होती. सन १९७१-७२ मध्ये ९५ झाली सन १९७४-७५ साली सो सोसायटीत एकूण सभासद संख्या १०१ झाली पुढे १९७६-७७ साली सभासद संख्येत चार सभासदांची भर पडली. सन १९७९-८० सभासद संख्या १०९ झाली. पुढे सन १९८८-८९ साली जवळ जवळ नऊ वर्षाच्या काळात सभासद संख्या तीच राहीली. पुढे सन १९८९-९० सालात सोसायटीतून दहा सभासद फुटले. आहेत. दहा लोकांनी राजीनामे दिले.

विठ्ठल सोसायटीतून सभासदांनी फुटल्याची कारणे विचारली असता त्यांनी असे सांगीतले कि सोसायटीशी वीस वर्षाचा करार होता तो संपला एवढेच ॲकॅडमीकच उत्तर दिले परंतु या सभासदांना विश्वासात घेऊन -

खोलवर विचारले असता त्यांनी दोन प्रकारची कारणे सांगीतले, एक म्हणजे सोसायटीचे वाढते गैर व्यवस्थापन. दुसरे म्हणजे सोसायटीवरती बडया - दलीत शेतक-यांच्या व बाहेरील घटकांचा अप्रत्यक्ष नियंत्रण सभासदांना बाहेरील शक्ती कुठल्या हे विचारले असता या सोसायटीतून फुटलेल्या व आपल्या जमिनी काढून घेतलेल्या सभासदांना विचारले असता व्यवस्थापनाविषयी व संस्थापकाविषयी स्पष्ट कारण देण्यास नकार दिला व सभासदांनी स्पष्ट करण्याचे टाळले. परंतु एका तक्रारीमध्ये तथ्य दिसते ते म्हणजे विठठल सहकारी शेती सोसायटी फक्त मोजक्याच दलीत शेतक-यानीच नियंत्रीत केलेली आहे. कारण सन १९७५ ते १९८९ पर्यन्त चेअरमन व सेक्रेटरी हे पाच एकरापेक्षा जास्त शेती सोसायटीत समाविष्ट केलेल्या सभासदांना पुन्हा पुन्हा कार्यकारिणीत सदस्यत्व मिळाल्याचे दिसते. त्यामुळे सोसायटीच्या लोकशाहीवादी कारभारात मर्यादा पडलेली दिसते. अल्प भूधारक व शेतमजूर सभासदां चेअरमन, सेक्रेटरी, कार्यकारिणीत संधी मिळाल्याचे फारसे दिसत नाही. वरील सन १९८९ ते सन १९९० साली बाहेर पडलेल्या सभासदांची व्यवस्थापना विषयी तक्रार रास्त आहे असेच वाटते. तसेच बागायती क्षेत्र हे जास्त जमिन असणा-या सभासदांच्या शेतीवरच वाढवल्याचे आढळून आले. तसेच थोडयाच जास्त जमिन असणा-यामध्ये पाच एकरापर्यन्त असणा-या सभासदांच्याच जमिनीची सुपिकता व जमिन सुधार केल्याचे जाणवले व सभासदांच्या - चर्चेतून आढळून आले.

सोसायटीत ज्या सभासदांनी आपल्या जमिनी समाविष्ट केलेल्या आहेत त्या सभासदांना समान खंड वाटला जात नाही. सभासदांच्या जमिनीची कस व प्रत ठरवून वेगवेगळा खंड दिला जातो हे खालील आकडेवारी व जमिनीच्या प्रतनुसार दिला जातो.

जमिनीचा खंड दर एकरी खालीलप्रमाणे

| जमिनीची प्रतवारी | सन १९६९ ते १९७३ | १९७४ ते १९७८ | १९७८ ते १९८९. |
|---|---|---|---|
| अ | ३०० रुपये | ४०० रुपये | ५०० रुपये |
| ब | १०० रुपये | ३०० रुपये | ४०० रुपये |
| क | ५० रुपये | २०० रुपये | ३०० रुपये |
| ड | – | – | २०० रुपये |

विठ्ठल संयुक्त सहकारी सोसायटीत समाविष्ट केलेल्या जमिनीची प्रतवारी ठरवून म्हणजे "अ" ही प्रतवारी सुपिक काळी कसदार जमिन म्हणून या जमिनीस सन १९६९ ते १९७३ पर्यन्त दर एकरी ३०० रुपये खंड मिळत असे पुढे या 'अ' प्रतीच्या जमिनीस सन १९७४ ते १९७८ ला दर एकरी ४०० रुपये खंड दिला गेला तसेच सन १९७८ ते १९८९ पर्यन्त दर एकरी ५०० रुपये खंड दिला होता.

"ब" ही प्रतवारी तांबूस काळी थोडी कमी सुपिकता असलेली जमिन हया जमिनीला दर एकरी सन १९६९ ते १९७३ पर्यन्त १०० रुपये खंड मिळत असे पुढे सन १९७४ ते १९७८ मध्ये एकरी खंड ३०० रुपये मिळू लागला. सन १९७८ ते १९८९ ला ४०० रुपये दर एकरी खंड मिळू लागला.

"क" ही प्रतवारी कोरडवाहू अगदीच कमी सुपिकता असलेली जमिन या जमिनीत सन १९६९ ते १९७३ पर्यन्त एकरी ५० रुपये खंड मिळत होता. १९७४ ते १९७८ साली २०० रुपये दर एकरी खंड दिला गेला. १९७८ ते १९८९ एकरी ३०० रुपये खंड दिला गेला. पुढे खंड देण्याची प्रक्रियेत

तिच स्थिती राहिली म्हणजे चांगल्या जमिनीत एकरी खंड ५०० रुपये दिला गेला. बहुसंख्य अर्ध्या एकरापर्यन्त जमिन असलेले सभासद होते. त्यांना प्रत्येक वर्षी खंड अगदीच कमी दिला गेला होता ते खालीलप्रमाणे वाटला गेला.

| जमिनीचा खंड रुपयांत | सभासदांची एकूण संख्या |
|---|---|
| एकरी ५०० रुपयापर्यन्त | ४९ |
| एकरी १००० हजारापर्यन्त | ९ |
| एकरी २००० हजाराच्यावर | ८ |
| | ६६ सभासद जमिन असलेली. |

वरील विवेचनात सोसायटीत जमिन अर्ध्या एकर असलेले सभासद जवळ जवळ निम्म्यापेक्षा जास्त सभासद होते. त्यांना २५० रुपये इतका - वर्षाला खंड मिळत असे फक्त एकूण सभासदात नऊ सभासदांना एकूण खंड १००० रुपयेपर्यन्त मिळाला त्यांची जमिन एकर ते तीन एकरापर्यन्त होती. तसेच २००० रुपयापर्यन्त फक्त आठ सभासदांना मिळाला.

अशा त-हेने सोसायटी खंडाचे असमान वाटप करते. त्यामुळे कमी खंड मिळणा-या सभासदांची संख्या जास्त होती. त्यामुळे सोसायटीत ठराविक सभासदांचा विकास झाला आहे. बहुसंख्य सभासदांची जमिन अर्ध्या एकर असल्याने ३०० ते ४०० रुपये पर्यन्त प्रत्येक वर्षी वार्षिक खंड मिळत गेला. त्यामुळे सोसायटीच्या जमिन असलेल्या सभासदांचा फारसा विकास झाला नाही. हे खंडापासूनचे उत्पन्न यामुळीच आहे [ सभासदामध्ये खंडा-विषयी नेहमी चर्चा चाललेली असते ].

सोसायटीत व्यवस्थापन हे सभासदांना खंडाचे असमान वाटप करते. त्यामुळे आर्थिक विकास ही असमान झालेला दिसतो. व्यवस्थापन व जमिनीचा खंड अत्यंत अल्प देते. आज सर्वत्र पाणी पुरवठ्याच्या सोयी तसेच आधुनिक शास्त्रीय पध्दतीची शेती नगदी पिके घेतल्याने वार्षिक एकरी उत्पादन वाढलेले असता जमिनीचा खंड एकरी दोन हजार रुपये एवढा मिळाला पाहिजे होता असे सभासदाकडून बोलले जाते, व्यवस्थापनास ही मान्य आहे की खंड वाढवला पाहिजे परंतु व्यवस्थापन दलितांच्या जमिनीस खंड वाढवून द्यावयास तयार नाही याची दोन कारणे दिसतात. पहिले कारण सोसायटीने मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली आहे. बँकेची कर्जे पूर्णपणे फिटलेली नाहीत. कर्जे फेडूपर्यन्त खंड वाढवला जाणार नाही असे व्यवस्थापनाकडून सभासदांना सांगीतले होते.

सोसायटीत समाविष्ट केलेली एकूण जमिन व सभासद.

| जमिनीचे क्षेत्र | सभासद |
|---|---|
| १० ते २० गुंठेपर्यन्त | ८१ |
| २१ गुंठे ते १ ऐकरापर्यन्त | ७ |
| २ एकराच्यावर | ४ |
| ठेकेदार व शेतमजूर | १७ |
| एकूण जमिन १२७ एकर | १०९ एकूण सभासद |

वरील विवेचनावरुन एक गोष्ट लक्षात येते की ती म्हणजे एकूण जमिनीपैकी कांही तुकडयावर अधिक लक्ष देण्याचा भेदभाव विठ्ठल शेती संस्थेत दिसून येतो. त्याचप्रमाणे शेतीच्या खंडा वाटणीबाबत ही असमानता

दिसून येते. अर्ध्या एकरापेक्षा कमी शेती असलेले अधिक सभासद आहेत. त्यांना ज्या सभासदांची जमिन जास्त आहे त्या जमिनीच्या आकाराप्रमाणे अधिक खंड मिळतो. त्यामुळे ज्यांच्याकडे कमी जमिन आहे त्यांच्या मनात अधिक जमिन असलेल्या या सभासदांच्या बद्दल एक प्रकारची असुया दिसून येते याचा परिणाम म्हणून सन १९८८-१९८९ सालात जवळजवळ १० सभासदानी संस्थेचा राजीनामा दिला या प्रकरणी अधिक चौकशी केली असता वीस वर्षाच्या करारानुसार मुदत संपल्यामुळे निमित्त दाखवून ही मंडळी बाहेर पडली. परंतु बाहेर पडण्याचे मुख्य कारण व्यवस्थापनातील गलथानपणा व खंड वाटपात भेदभाव हे मुख्य दोन कारणे निदर्शनात आले.

विठ्ठल सहकारी शेतीचा अभ्यास करित असताना आमच्या लक्षात आणखी एक गोष्ट आली ती म्हणजे ज्या सभासदांची तीन एकरापासून ते पाच एकरापर्यन्त जमिन आहे त्या सभासदानी पुन्हा आणखी २० वर्षासाठी संस्थेने बांधून घेतले ही दलीतातील तथाकथीत बडे शेतकरी संस्थेत राहण्याची तीन कारणे दिसतात पहिले कारण म्हणजे सभासदाला संस्थेच्या कारभाराचे नियंत्रण करता येते. आतापर्यन्त संस्थेच्या मुख्यपदी पांच एकरापेक्षा जास्त जमिन असलेले सभासद दिसून आले दूसरे म्हणजे संस्थेच्या या पदांचा फायदा घेऊन हे बडे सभासद ग्रामपंचायत, जिल्हापरिषदा व इतर सहकारी संस्थामध्ये सुध्दा जावू शकलेली आहेत म्हणजे काही सभासदराजकीय फायद्यासाठी संस्थेचा उपयोग करून घेत आहेत. तिसरे कारण म्हणजे संस्थेच्या पदामुळे या बडया शेतक-यांना गावात इतर सवर्णाबरोबर प्रतिष्ठा मिळते या वरील तीन कारणामुळे ही बडी मंडळी संस्थेत राहिली आहेत.

विठ्ठल संयुक्त शेती सोसायटीतील मजुरांचे प्रश्नसुध्दा वरचेवर वाढत आहेत. संस्थेच्या स्थापनेमुळे एक गोष्ट जरूर झाली ती म्हणजे काही कुटूंबाना

बागायती शेती असल्यामुळे वर्षातून जवळजवळ प्रत्येक महिने काम मिळते. त्यांना सर्वसाधारणपणे वार्षिक एक हजार ते दोन हजार रुपये पेक्षा जास्त मजूरी मिळते. तसेच शेतमजुरास वार्षिक १००० रुपयापर्यन्त सोसायटीतील कामाची मजुरी सरासरी वार्षिक मिळते सोसायटीचे शेतीत काम करणा-या मजुरास वार्षिक जवळजवळ एक लाख रुपये कामाची शेतमजुरी वाटावी लागते.

सभासदानी सोसायटीच्या शेतीवर नेमके किती दिवस काम करुन किती मजुरी मिळवली हे सांगता येणे कठिण आहे परंतु सोसायटीच्या शेतीवर काम करुन मगच त्यांनी इतरत्र काम केले असे गृहीत धरले तर असा निष्कर्ष निघतो की सोसायटीची शेती ही सभासदांना वर्षभर मजुरी देण्यास असमर्थ आहे, त्यामुळे मजुरीसाठी सभासदांना इतरत्र सर्वणांच्या शेतीवर काम - शोधण्याखेरीज गत्यंतर नाही असे दिसते.